भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. १०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०४/०१/२०१७

**१) घराचा दाराचा ताला तोडुन आत प्रवेश करुन घरातील सामानाची व नगदी पैश्याची चोरी . :–**

दिनांक ०१/०१/२०१७ चे पुर्वी यातील फिर्यादी श्रीमती प्रमिला अंताराम कोचे वय ५० वर्ष, रा. वडद ही बाहेर गावी घराचे दाराला कुलुप लावुन गेली असता यातील संशयीत आरोपीने घरी कुणी नसल्याची संधी साधुन समोरील दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करुन घराचे आत मध्ये ठेवलेले २०० किलो तांदुळ, २ ब्लॅन्केट निळया व लाल रंगाचे, ३ नग प्लॉस्टीक खुर्ची चॉकलेट रंगाची, ५ लिटर मातीचे तेल व नगदी १,०००/–रु. चा असा एकुण ५,१००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**२)नॉयलान दोरीने गळफास लावुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक ०३/०१/२०१७ रोजी १३.३० वा. दर. यातील मृतक विजयसींह धनीराम सोमनाथे वय ६० वर्ष, रा. पाथरी पुर्नवसन याने ठेक्याने केलेल्या शेतीमधील धुऱ्यावरील शेंबळीच्या नॉयलान दोरीने स्वतः गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी वसंता रामचंद्र हटवार वय ४२ वर्ष रा. पाथरी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) उपचारा दरम्यान महीलेचा मृत्यु:–**

दिंनाक २६/१२/२०१७ रोजी १७.०० वा. दर. यातील मृतक मंजुळा नथ्थुजी ढोरे वय ५५ वर्ष, रा. डांबेविरली हीला अल्सरची बिमारी असुन त्यामुळे तिच्या पोटात जास्त त्रास होत असल्याने तिला औषोधोपचाराकरीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने पोस्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. नेताम पोस्टे लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद केला. पुढील पोउपनी. लाकडे पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहे.

**४) विष प्राशन केल्याने उपचारादरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक ०२/०१/२०१७ रोजी १४.४५ वा. दर. यातील मृतक कृष्णा दुर्गादास उरकुडे वय ४८ वर्ष, रा. सुकळी याने दि.०२/०१/२०१७ ला १२.३० वा.दर. वोपी. पॉयझनींग प्राशन केल्याने त्यास औषोधोपचारा करीता सा.रू. भंडारा येथे भरती केले असता उपचारादरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरून पोस्टे भंडारा येथे मर्ग क्र. ००/१६ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. वाकलकर पोस्टे मोहाडी यांनी कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद केला. पुढील तपास पोउपनी. गेडाम पो. स्टे. मोहाडी हे करीत आहे.

**५) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक ०३/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ५४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी, तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४८ केसेस करण्यात आलेल्या आहे

**(बी. आर. गाडे)**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

४/१/१७

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.